# एकांत...

तुझ्या विना सांज सखे, जीव ओशाळला
    गच्च नभी हे चांदणे, अंधार मंद जाहला    ॥ १ ॥

सोसतो विरह मी, माझ्या श्वासा श्वासातला
    अंतर श्वासा श्वासातले, एकांत कुंद जाहला  ॥ २ ॥

चंद्र शोधती तारका, सवे घेउनी अंबराला
    तुझा पौर्णिमेचा चंद्र, माझा छंद जाहला    ॥ ३ ॥

कधी नीज लागली, न कळे मुळी मला
    सहवास विचार तुझा, स्वप्नात धुंद जाहला  ॥ ४ ॥

जरी असेल स्वप्न, पाहिले असे तुला
    श्वास हर एक माझा, तुझा गंध जाहला    ॥ ५ ॥

- © सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78